तालुका क्रीडा अधिकारी,गट- ब मधील
अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः संक्रीआ-१७१९/प्र.क्र.६३/क्रीयुसे-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

वाचा:- १.शासन आदेश क्रमांक संक्रीआ-२०१९/प्र.क्र.४२/क्रीयुसे-२,दिनांक ३१ मे,२०१९
२. शासन आदेश क्रमांक संक्रीआ-१७१९/प्र.क्र.६३/क्रीयुसे-२, दिनांक ३० जुलै, २०१९

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील नियम ४ (४) व ४ (५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनुसार खालील तक्त्यात नमूद क्रीडा व युवक सेवा संचालयनालयाच्या आस्थापनेवरील तालुका क्रीडा अधिकारी,गट- ब या संगर्वातील अधिकाऱ्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक - ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	नाव व पदनाम	बदलीनंतरची पदस्थापना व अभिप्राय
१	**२**	**३**
१	श्री राजेश बागुल ,तालुका क्रीडा अधिकारी, बारामती,जिल्हा पुणे	संदर्भाधीन क्रमांक २ च्या आदेशान्वये तालुका क्रीडा अधिकारी, कळवण,जिल्हा नाशिक येथे करण्यात आलेली बदली रद्द करून तालुका क्रीडा अधिकारी, खेड,जिल्हा पुणे येथे बदली करण्यात येत आहे.
२	श्रीमती आशा मेश्राम ,तालुका क्रीडा अधिकारी, रामटेक,नागपूर	संदर्भाधीन क्रमांक २ च्या आदेशान्वये तालुका क्रीडा अधिकारी, वणी,जिल्हा यवतमाळ येथे करण्यात आलेली बदली रद्द करून तालुका क्रीडा अधिकारी, हिंगणा, जिल्हा नागपूर येथे बदली करण्यात येत आहे.
३	श्रीमती पल्लवी धात्रक, तालुका क्रीडा अधिकारी, नांदगाव, जिल्हा नाशिक	संदर्भाधीन क्रमांक २ च्या आदेशान्वये तालुका क्रीडा अधिकारी, येवला,जिल्हा नाशिक येथे करण्यात आलेली बदली रद्द करून तालुका क्रीडा अधिकारी, इगतपुरी,जिल्हा नाशिक येथे बदली करण्यात येत आहे.

२. सदरचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१८३६३६७४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2019.09.19 12:36:22 +05'30'

(इ. मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा.
३. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी.
४. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
५. संबंधिक अधिकारी (संचालनालयामार्फत)

प्रत माहितीसाठी

६.मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे विशेष कार्य अधिकारी.
७. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक.
८. निवड नस्ती.